# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक :- १३५-२२** **दिनांक :- ११/०५/२०२२**

## मा. पोलीस महासंचालक यांचे हस्ते मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय अंतर्गत मांडवी पोलीस ठाण्याचे उद्घाटन.

मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत आज दिनांक ११/०५/२०२२ रोजी मा. श्री. रजनीश शेठ, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे हस्ते मांडवी पोलीस ठाण्याचे उद्घाटन करण्यात आले. विरार पोलीस ठाणे हद्दितील वाढती लोकसंख्या व त्यामुळे वाढलेल्या गुन्हेगारीचे प्रमाण लक्षात घेता नवीन पोलीस ठाण्याची निर्मीती करणे आवश्यक झाले होते. मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय अंतर्गत सध्या १५ पोलीस ठाणे असून नवीन मांडवी पोलीस ठाण्याच्या निर्मीतीनंतर आता १६ पोलीस ठाणे कार्यरत असणार आहे. नवीन पोलीस ठाण्याची निर्मीती झाल्याने सदर भागामध्ये गुन्हेगारी कृत्यांवर नियंत्रण येवून गुन्हेगारीस आळा बसणार आहे. मांडवी पोलीस ठाणे अंतर्गत मांडवी, चांदीप, खारडी, चंदनसार, काशिदकोपर, मेढा, तिल्हेर, कन्हेर, सकवार, भारोड, बावखळ असे कार्यक्षेत्र असून मांडवी पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक श्री. प्रफुल्ल वाघ मो क्र ८८८८८३४१३६ हे कामकाज पाहणार आहेत.

मा. पोलीस महासंचालक यांनी उपस्थित पोलीस अधिकारी व अंमलदार यांचेशी संवाद साधून पोलीसांनी जनतेच्या रक्षणासाठी व गुन्हेगारी वृत्तींना आळा घालण्यासाठी सदैव तत्पर राहून कर्तव्य करावे याबाबत मार्गदर्शन केले.

मांडवी पोलीस ठाणे उद्घाटनप्रसंगी मा. खासदार श्री. राजेंद्र गावीत, मा. आमदार श्री. राजेश पाटील, मा. पोलीस आयुक्त श्री. सदानंद दाते, मा. अपर पोलीस आयुक्त श्री. श्रीकांत पाठक, मा. श्री. अनिलकुमार पवार, आयुक्त वसई-विरार महानगरपालिका, मा. पोलीस उप आयुक्त श्री. प्रशांत वाघुंडे व इतर पोलीस अधिकारी/अंमलदार उपस्थित होते.






मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय
मांडवी पोलीस ठाण्याचे
उद्घाटन दि. ११/०५/२०२२ रोजी
मा.श्री. रजनिश सेठ (भा.पो.से.)
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
मा.श्री. राजेंद्र गावीत
मा.श्री. राजेश पाटील